लग्नास विरोध : वडिलास संपवण्याचा मुलीनेच रचला कट

अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. १० ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३१२ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

शाळेतील शिपायाने शेततळ्यात जीवन संपवले सुनेसह तीन नातवंडांना आजोबांनी वाचवले

उत्तर सोलापूर तालुक्यातील नरोटेवाडीत धक्कादायक प्रकार

सुराज्य/उत्तर सोलापूर

तालुक्यातील नरोटीवाडी येथे बुधवारी सकाळी धक्कादायक घटना घडली. सोलापुरातील एका खाजगी शाळेत सेवक म्हणून काम करणाऱ्या मार्डी येथे धक्कादायक घटना घडली आहे. खाजगी अनुदानित शाळेत शिपाई म्हणून काम करणाऱ्या हणमंत विठ्ठल काळे या ३६ वर्षीय व्यक्तीने स्वतःच्याच शेतातील शेततळ्यात उडी मारून आत्महत्या केली.१३ वर्षांपासून पगार नाही. त्यामुळे घरात पत्नीशी सतत भांडणे व्हायची. या भांडणाला वैतागून त्याने पत्नी आणि तीन चिमुकल्यांसह जीवन संपवण्याचा प्रयत्न केला मात्र विठ्ठल काळे यांनी त्याची पत्नी (सूनबाई) व तीन चिमुकल्यांना (नातवंडे) वाचवण्यात यश मिळवले.

पत्नी सुनिता (वय ३२) ही बेशुद्ध पडल्याने तिला उपचारासाठी सोलापूरच्या एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शालार्थ आयडीसाठी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी लाच मागितल्याने आपल्या मुलाने टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप पोलीस दलातून निवृत्त झालेले विठ्ठल काळे यांनी केल्यामुळे खळबळ माजली आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की- काळे फॅमिली ही मूळची मार्डीची.त्यांची नरोटेवाडीत शेतजमीन आहे. मयत मयत हणमंत कांबळे हा सोलापुरातील चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशालेत शिपाई म्हणून काम करत होता.त्याला १३ वर्षे झाली वेतन मिळाले नाही. वेतन का मिळत नाही म्हणून पत्नीकडून सतत विचारणा होत होती.वेतन मिळावे म्हणून त्याच्याकडून प्रयत्नही सुरू होते परंतु शिक्षण कार्यालयात त्याला अडचणी येत होत्या.त्याच विषयावरून भांडण झाल्यानंतर हणमंत हा रागाच्या भरात पत्नीसह चिमुकल्यांना घेऊन शेततळ्याकडे गेला.वडील विठ्ठल यांना संशय आला. तेही त्यांच्या मागे गेले.हणमंतने पहिल्यांदा पत्नीला ढकलले. चिमुकल्यांना ढकलणार होता. तितक्यात विठ्ठल हे शेततळ्यावर पोहचले होते.त्यांनी तीनही चिमुकल्यांना तळ्यापासून लांब सरकावले. तोपर्यंत हणमंतने उडी मारली होती. सुनबाईला कसेबसे वाचवले परंतु मुलाला वाचवण्यात त्यांना यश आले नाही. ती बेशुद्ध पडली.तिला तातडीने उपचारासाठी सोलापूरला पाठवले.गायत्री वय-८वर्षे,यमुना वय ६ वर्षे आणि मुलगा सुवंश वय २ वर्षे ही मुले आजोबांच्या कृपेने बचावली. शालार्थ आयडी मंजूर न झाल्याने पगार झालाच नाही. हे शालार्थ आयडी बनवण्यासाठी पुण्यातल्या शिक्षण उपसंचालक कार्यालयातील काही अधिकाऱ्यांनी लाचेची मागणी केली होती. पगार नसल्याच्या तणावातून हणमंत काळे यांनी आत्महत्या केल्याचा आरोप त्यांचे वडील विठ्ठल काळे यांनी केला आहे.

जवळपास १३ वर्षांपूर्वी हणमंत हा सोलापुरातील खासगी अनुदानित शाळेत शिपाई म्हणून भरती झाला.एमकॉम बीएड ही पदवी असतानाही त्याला शिपाई म्हणून नियुक्त केले. सुरुवातीला त्यांच्या नियुक्ती संदर्भात न्यायालयामध्ये प्रकरण सुरू होते. मात्र न्यायालयाने त्यांच्या नियुक्तीचे आदेश दिले. त्यानंतर २०१६-१७ साली पगार सुरू करण्यासाठी शालार्थ आयडी बंधनकारक असल्याचा नियम करण्यात आला. तेव्हापासून हणमंत याचा प्रस्ताव शिक्षण विभागातील उपसंचालक कार्यालयात प्रलंबित होता. मात्र शालार्थ आयडीसाठी मंजूर करण्यासाठी काही अधिकाऱ्यांनी ५ लाख रुपयांची मागणी केली होती. पैसे न दिल्यानेच शालार्थ आयडी दिला नाही. त्याच तणावातून मुलाने टोकाचे पाऊल उचलल्याची तक्रार विठ्ठल काळे यांनी पत्रकारांशी बोलताना केला. उच्च न्यायालयाच्या आदेश होऊन देखील त्याला गेल्या १३ वर्षांपासून वेतन मिळाले नव्हते. त्यामुळे तो निराश झाला होता. आज सकाळी सात वाजेच्या सुमारास तो पत्नी आणि मुलीला सोबत घेऊन स्वतःच्या शेतातील शेततळ्यात उडी टाकून आत्महत्या करण्यासाठी गेला होता. आवाज ऐकून विठ्ठल काळे शेततळ्याजवळ आले. आणि मुलगा हणमंत आणि सुनेची समजूत घातली. पाठीमागे असलेल्या त्यांचा मुलगा हणमंत काळे यांनी पत्नी सोबत शेततळ्यात उडी टाकली.

(संबंधीत वृत्त पान ७ वर)

माझ्या मुलाचा जीव अधिकाऱ्यांनी घेतला

घरातील भांडणाची आपबिती विठ्ठल कांबळे यांनी डोळ्यात अश्रू आणून प्रसार माध्यमांना सांगितली.ते म्हणाले की, मी गडचिरोलीत सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून सेवा केली. तब्बल पाच वर्ष सेवा करुन मी आठ वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झालो. तेव्हापासून कुटुंबाचा उदरनिर्वाह मीच करत आलोय. माझा पगार कधी होईल याच तणावात मुलगा कायम होता. आज आदिवासी दिनाच्या दिवशी आदिवासी कुटुंबातील माझ्या मुलाचा जीव या अधिकाऱ्यांनी घेतला.'शालार्थ आयडीसाठी अधिकाऱ्यांकडून लाचेची मागणी, तणावातून मुलाने जीव दिला'

अन् पाण्यात उडी टाकली

पाठीमागे असलेला मुलगा आणि सुन अद्याप का आले नाही. म्हणून विठ्ठल काळे हे आल्यापावली परत शेततळ्याजवळ गेले. तेव्हा पाण्यातून बुडबुडे येत असल्याचे त्यांना दिसले . क्षणाचाही विलंब न करता विठ्ठल काळे यांनी पाण्यात उडी टाकली. आणि सुनेला पाण्याबाहेर काढले . त्यानंतर पुन्हा पाण्यात जाऊन शोध घेतला. तेव्हा मुलगा हनुमंत हा बेशुद्ध अवस्थेत आढळला. सुनेला खाजगी रुग्णालयात तर मुलाला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता हनुमंत काळे हा उपचारापूर्वीच मयत झाला.

इंटरकास्ट मॅरेजला घरात विरोध झाला; बापाला संपवण्याचा मुलीनेच कट रचला

माढा शहरातील बाप-मुलीच्या नात्याला काळीमा फासणारी संतापजनक घटना

सुराज्य/माढा

माढा शहरात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.इंटरकास्ट मॅरेज करायला घरातून विरोध झाला.मुलगी भयंकर चिडली.वडिलांचाच काटा काढला तर आपल्या लग्नाचा मार्ग मोकळा होणार नाही,अशी मानसिकता तयार झाली.त्यानंतर प्रियंकर आणि त्याच्या साथीदार मित्रांना चक्क सुपारी देऊन वडिलांना संपवण्याचा कट रचला. पुण्याहून शेटफळमार्गे माढ्याला येण्यासाठी वडिलांना गाडी घेऊन बोलावले.वडिलांना काय होणार याची ध्यानीमनी कल्पनाही नव्हती.वडाचीवाडीजवळ गाडी आल्यानंतर प्रियकर व त्याच्या साथीदारांनी वडिलांवर हल्ला केला. मुलीने फिर्यादही दिली.पण पोलिसांच्या तपासात धक्कादायक माहिती उजेडात आली.मुलीनेच

हा कट रचल्याचे उघड झाले. पोलिसांनी अवघ्या १२ तासांत तपासाची चक्रे वेगाने फिरवून सत्य उजेडात आणले. फिर्यादीच आरोपी ठरली.मुलगी,प्रियकर आणि त्याचे साथीदार अशा आठ जणांना अटक करण्यात आली.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की- प्रसिध्द व्यापारी महेंद्र शहा यांना मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या घटनेच्या पोलीस तपासात धक्कादायक बाब समोर आली. फिर्यादीच आरोपी असल्याचे निष्पन्न झाले असून आंतरजातीय विवाहास विरोध करणाऱ्या बापालाच प्रियकरासह त्याच्या साथीदारांना सुपारी देऊन काटा काढण्याचा संतापजनक प्रकार उघड झाला आहे. माढा पोलिसांनी अवघ्या १२ तासात तपासाची चक्रे फिरवून सत्यता समोर आणून मुलीसह एकूण सहा जणांना अटक केली. बुधवारी न्यायालयात हजर केले असता पुढील तपासासाठी शनिवारपर्यंत सर्वांना पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

बाप-लेकीच्या नात्याला कलंक

एकूणच आंतरजातीय प्रेमविवाह करण्यासाठी नकार देणाऱ्या जन्मदात्या बापालाच प्रियकराच्या मदतीने मारहाण करण्याचा कट केल्याचे उघडकीस आल्याने बाप-लेकीच्या नात्याला कलंक लागल्याची भावना लोकांमधून व्यक्त होत आहे.

माढ्यातील एमआरएफ टायरचे व्यापारी महेंद्र शहा यांना सोमवारी रात्री साडे दहाच्या सुमारास माढा शेटफळ रस्त्यावर वडाचीवाडी नजीक मारहाण झाली होती.

शहा यांची मुलगी साक्षी शहा हिने अज्ञात इसमांनी मारहाण केल्याची तक्रार दिली होती. पोलीस निरीक्षक हणुमंत खणदाळे आणि तपास अधिकारी सहा पोलीस निरीक्षक महंमद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने केलेल्या तपासात धक्कादायक घटना समोर आली.

एमबीएचे शिक्षण घेणारी मुलगी साक्षी महेंद्र शहा हिचे चैतन्य कांबळे याच्या सोबत प्रेमसंबंध होते. दरम्यान लग्न करण्याच्या त्यांच्या इच्छेस वडील महेंद्र शहा यांचा विरोध होता. हा विरोध कायमस्वरूपी संपवण्यासाठी साक्षी व तिचा प्रियकर चैतन्य याने प्लॅन करून ही घटना घडवून आणली.प्रेम विवाहाला वडील परवानगी देत नाहीत यावर उपाय म्हणून वडिलांचे हातपाय मोडून घरात बसविण्याचा प्लॅन प्रियकराबरोबर केला. पुण्याहून शेटफळ मार्गे तिने माढ्याला येण्याचे ठरवले. शेटफळ येथे उतरून वडिलांना न्यायला येण्यासाठी बोलावून घेतले आणि मोबाईल वरून एसएमएस करून प्रियकराला ठरल्याप्रमाणे सांगून वडाचीवाडी जवळ मारेकरी थांबवले.प्रियकराने मारेकरी मित्रांना पाच हजार रुपये देऊन ठरल्या ठिकाणी पाठवले. शेटफळकडून माढ्याकडे येताना वडाचीवाडी जवळ लघुशंकेसाठी गाडी थांबवण्यासाठी साक्षीने वडिलांना सांगितले. गाडी थांबविल्यानंतर मारेकऱ्यांनी महेंद्र शहा यांना दांडक्याने डोक्यात, पायावर जबरी मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

चैतन्य याने आतिश लंकेश्वर, मयूर चंदनशिवे, राम पवार आनंद ऊर्फ बंड्या जाधव आणि स्वतः फिर्यादी व परत आरोपी ठरलेली साक्षी शहा अशी आरोपींची नावे आहेत.

यातील एकाने शहा यांच्या डोक्यात लाकडी दांडा जोराने मारल्याने शहा यांच्या डोक्यास जबर मार बसला. प्रारंभी माढ्यातील खाजगी रुग्णालयात उपचार करून सोलापूर येथे सध्या उपचार सरू आहेत. शहा सध्या गंभीर स्थितीत आहेत.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

कारवाई झाली वाटतं !

कल्याण
380-10-488

मेन बाजार
150-69-144

गळफास घेताना दोरी तुटल्याने खाली कोसळून मृत्यू

सोलापूर : छताच्या वाशाला दोरीने गळफास घेतल्यानंतर दोरी तुटली आणि खाली कोसळलेल्या गळफास घेतलेला ५५ वर्षीय इसम मरण पावला. ही घटना स्वागत नगर परिसरातील विष्णुनगरात बुधवारी सकाळच्या सुमारास घडली. विजयशेखर नागप्पा मादगुंडी (वय ५५ रा. विष्णुनगर) असे गळफास घेतलेल्या इसमाचे नाव आहे. दारूच्या नशेत गळफास घेताना दोरी तुटून बेशुद्ध झाला होता. त्याच्या आवाज आल्याने अनिता (पत्नी) यांनी त्याला बेशुद्ध अवस्थेत रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.